अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# माळशेज अपघातामागे सरकारचा बेदरकारपणा

बऱ्याच सरकारी कार्यालयामध्ये कोणत्या ना कोणत्या निमित्ताने एक वार्षिक उत्सव म्हणून सत्यनारायणाची पूजा घातली जाते. अगदी याच पध्दतीने दरवर्षी रस्ते वाहतूक विभागातर्फे सुरक्षा सप्ताह पाळला जातो. नुकताच रस्ते सुरक्षा सप्ताह राज्यभरात पाळला गेला आणि या सप्ताहाच्या सुरुवातीलाच माळशेज घाटात एसटी बसला अपघात झाला. त्यामध्ये तब्बल ३८ लोकांचे बळी गेले. रस्ते सुरक्षा सप्ताह आणि माळशेज घाटात झालेला अपघात या दोन्ही गोष्टींची तुलना केली, तर रस्ते सुरक्षा सप्ताह हा केवळ नावापुरताच पाळला जातो. सत्यनारायणाच्या पूजेसारख्या वार्षिक उपक्रम पार पाडायचा म्हणून तो आयोजित केला जातो. परंतु आज माळशेज घाटातल्या असुरक्षित रस्त्याने सरकारच्या बेदरकारपणाचे प्रदर्शन घडले. राज्यातल्या वाढत जाणाऱ्या रस्ते अपघातांचे प्रमाण पाहिले तर सरकारच्या निष्काळजीपणाचीच कल्पना येते. अनेक अपघातांमध्ये चालकांवर बेदरकारपणे गाडी चालवल्याचा ठपका ठेवला जातो. परंतु आम्हाला असे वाटते की, या अपघातामागे बेदरकारपणे सरकार चालवणारेच जास्त दोषी आहेत. महाराष्ट्रात मुंबई-पुणे, मुंबई-नाशिक किंवा पुणे-बंगलोर आणि काही प्रमाणात मुंबई-अहमदाबाद हे चार रस्ते सोडले तर जवळपास ७० टक्के रस्ते अत्यंत वाईट अवस्थेत असल्याचे दिसून येते. माळशेज घाट हे त्याचे अत्यंत जिवंत उदाहरण म्हणता येईल. पश्चिम महाराष्ट्रात जाण्यासाठी नगरमार्गे माळशेज घाट हा जवळचा रस्ता ठरतो. गेल्या ४० वर्षांपासून माळशेज घाटाच्या धोकादायक परिस्थितीच्या कहाण्या सांगितल्या जात आहेत. दरड कोसळणे पावसाळ्यामध्ये एसटी बसेस बंद पडणे आणि अरुंद मार्ग असल्यामुळे वाहतुकीत प्रचंड अडथळा येणे. मुळातच कठीण वळणे असलेला माळशेज घाट रात्रीच्या प्रवासासाठी सुखकर नाही म्हणून त्याकडे आणखीच दुर्लक्ष केले गेले. आतापर्यंत जी काही वाहतूक होत राहिली ती चालकांनी आणि प्रवाशांनी आपल्या जिवाची जोखीम पत्करूनच सुरू होती. सरकारला हा घाटरस्ता सहज सोपा करावा. नवा पर्यायी मार्ग तयार करावा अशी बुध्दीच झाली नाही आणि तात्पुरत्या दुरुस्त्या करून हा मार्ग चालू ठेवला गेला. मुंबई-पुणे रस्ता ज्याप्रमाणे युध्दपातळीवर आधुनिक पध्दतीने बांधला गेला त्याच पध्दतीने कल्याण-नगर विशेषत:, माळशेज घाटातून जाणारा रस्ता अशाच आधुनिक पध्दतीने बांधला जाऊ शकला असता आणि अनेकांचे प्राण वाचू शकले असते.

## लोकसंख्या वाढीपेक्षा वाहनांची वाढ मोठी

माळशेज घाटाच्या अपघाताने सरकारच्याच बेदरकारपणाची लक्तरे टांगली गेली आणि मग मुख्यमंत्र्यांना एसटी महामंडळाचे आधुनिकीकरण करण्याची अचानकपणे गरज वाटू लागली. परंतु या उपाययोजनांनी कदाचित अपघात थोडे फार कमी होतील. मात्र मूळ दुखणे कायम राहील. कारण आज रस्ते कमी आणि वाहनांची प्रचंड संख्या असे व्यस्त प्रमाण पहायला मिळते. असे म्हटले जाते की, महाराष्ट्रातल्या लोकसंख्या वाढीचे प्रमाण वर्षाला १५ टक्के आहे. तर वाहनांच्या वाढीचे प्रमाण तब्बल १५० टक्के आहे. देशात इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रात दरवर्षी सर्वाधिक वाहनांची नोंदणी होते. आज महाराष्ट्रामध्ये जवळपास सव्वा कोटी वाहने असावीत, असा अंदाज सांगितला जातो. याचा अर्थ रस्त्यांच्या संख्येचा किंवा रस्त्यांच्या दुर्दशेचा विचार न करता वाहनांना परवानगी दिली जात आहे. एकेका कुटुंबाकडे तीन-तीन, चार-चार वाहने असल्याचे आढळून आले आहे. मुंबईसारख्या महानगरात वाहनांच्या पार्किंगलाही जागा उरलेली नाही. कुठेतरी वाहनांच्या या गर्दीला रोखणे गरजेचे आहे आणि म्हणून हा अपघात घडल्यानंतर सरकारने दुसरे वाहन खरेदी करण्यावर २०० टक्के रोड टॅक्स लागू करण्याचा विचार सुरू केला. एकाच व्यक्तीने किंवा एकाच पत्त्यावर दुसऱ्या वाहनांची नोंदणी झाली तर त्या वाहन मालकाला २०० टक्के टॅक्स आकारण्याचा प्रस्ताव सरकार तयार करीत आहे. सरकारला हे उशिरा सुचलेले शहाणपण आहे. मात्र नुसताच टॅक्स आकारून भागणार नाही. तर मुळातच राज्यातील रस्ते हे मोठे प्रशस्त आणि आधुनिक झाले पाहिजेत.

## टोलचा पैसा जातो कुठे

मुंबई-पुणे किंवा मुंबई-नाशिक या महामार्गाचे आधुनिकीकरण झाल्याबरोबर अपघातांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली हे प्रत्यक्ष सिध्द झाले असताना रस्त्यांकडे सरकार का दुर्लक्ष करते हे लक्षात येत नाही. बांधा, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वानुसार रस्त्यांची बांधकामे वेगाने होऊ शकतात आणि अपघात टाळून लोकांचे जीव वाचवता येऊ शकतात. सरकारचा बेदरकारपणा किती टोकाचा असतो हे गोवा-मुंबई महामार्गावर सतत होणाऱ्या भीषण अपघातांनी दाखवून दिले आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी तर पणजी ही पर्यटकांची राजधानी मानली जाते. या दोन शहरांच्या दरम्यान रोज जवळपास १० हजार वाहने ये-जा करतात. अशा परिस्थितीत हे महामार्गसुध्दा चौपदरी केले पाहिजेत याचे गांभीर्य सरकारला वाटले नव्हते आणि म्हणूनच या महामार्गावर जे अपघात झाले, त्यामागेसुध्दा हाच सरकारी बेदरकारपणा कारणीभूत ठरला ही वस्तुस्थिती नजरेआड करून चालणार नाही. सरकारी कामकाजाची दिरंगाई जर लोकांचे प्राण घेणारी ठरत असेल तर त्याचा निषेधच करावा लागेल. जे रस्ते राज्याच्या विकासाला पूरक ठरतात, चांगले रस्ते हे दळणवळणाचे उत्तम माध्यम असते आणि औद्योगिक विकासासाठी चांगले रस्ते हे पायाभूत सुविधा म्हणून मानले जातात, ज्यातून पर्यटनालाही चालना मिळते आणि सरकारचे उत्पन्नही वाढते या सगळया जमेच्या गोष्टी असूनही सरकारने रस्ते दुरुस्तीला प्राधान्य देऊ नये ही सरकारची दिवाळखोरी म्हणावी लागेल. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ठिकठिकाणी करोडो रुपयांचा टोल गोळा केला जातो तरी रस्ते खराब ठेवले जातात. मग हा करोडोचा टोलचा पैसा कोणाच्या खिशात जातो? हेही एक गूढच ठरते. भविष्यकाळात माळशेज अपघातासारख्या घटना टाळायच्या असतील तर सरकारने बेदरकारपणा सोडून जबाबदारपणा दाखववा आणि रस्ते दुरुस्तीला प्राधान्य द्यावे.